स्थायीकरणाचे प्रमाणपत्र देण्याच्या अधिकारांचे प्रत्यावर्तन.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः मवैअ- २०१८/प्र.क्र.४४०/सेवा-३

१० वा मजला, संकुल इमारत, गो.ते. रुग्णालय, संकुल इमारत,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक : १६ सप्टेंबर, २०१९

वाचा :- १) शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्रमांक स्थाप्रप्र-१४१४/(प्र.क्र.७३/१४)/१३अ, दि. ११.०९.२०१४.

२) शासन परिपत्रक सा.प्र.वि. क्रमांक स्थाप्रप्र-१४१५/(प्र.क्र.९७/१५)/१३अ, दि. २१.०८.२०१५.

प्रस्तावना :-

संदर्भाधिन शासन परिपत्रक क्र. १ अन्वये प्रत्येक अस्थायी शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांस स्थायित्व प्रमाणपत्र प्रथम पदावरील नियुक्तीच्या संदर्भात देणेबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकातील तरतुदीनुसार गट-अ व गट-ब (राजपत्रित) या अधिकाऱ्यांबाबत नियुक्ती प्राधिकारी यांना स्थायित्व प्रमापणपत्र देण्याचे अधिकार आहेत. प्रशासनात गतिमानता येण्यासाठी निर्णय घेण्याचे अधिकार आवश्यकतेनुसार संदर्भित परिपत्रक क्र. २ अन्वये प्रशासकीय विभागाच्या सचिवांना स्थायित्व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रत्यावर्तित करण्यात आले आहेत.

२. वैद्यकीय अधिकारी, गट-अ (वेतनस्तर S-२०:५६१००-१७७५००) या संवर्गाची संख्या विचारात घेता दरवर्षी स्थायित्व प्रमाणपत्राकरिता पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या जास्त आहे. तसेच संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांचे प्रस्ताव या प्रशासकीय विभागाकडे विहित मार्गाने प्राप्त होण्याकरिता बराच कालावधी लागत असल्याने स्थायित्व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रत्यावर्तित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुषंगाने “सेवेत स्थायिकरणाचे प्रमाणपत्र देऊन कायम करणे” या विषयाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार प्रत्यायोजित करण्याबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक:-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा मधील वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनस्तर S-२०:५६१००-१७७५००) या संवर्गाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथे नमुद अ.क्र. १ मधील नमुद अटी व शर्ती नुसार स्थायित्व प्रमाणपत्र देण्यात येतात. सामान्य प्रशासन विभागाच्या वाचा येथे नमुद अ.क्र. २ मधील परिपत्रकानुसार स्थायित्व लाभ प्रमाणपत्र देण्याचे अधिकार प्रशासकीय विभागाच्या अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ (वेतनस्तर S-२०:५६१००-१७७५००) यांना स्थायित्व लाभ प्रमाणपत्र देण्याचे प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई-४०००0१ यांचे अधिकार आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडे प्रत्यावर्तित करण्यात येत आहेत.

२. स्थायित्व प्रमाणपत्र देण्याबाबत शासन परिपत्रक दि. ११.०९.२०१४ मधील इतर सुचना कायम राहतील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११०५३४०४५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Hanmantrao Bhosale

Digitally signed by Satish Hanmantrao Bhosale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=814c799b5179dd55944f37ef369de7b98d5d22be413ef2efda9ea389e98444ce, serialNumber=50368303277ad4cc81c8f5dc78f44c79a8908848f662f446ecc012cc85676fc9, cn=Satish Hanmantrao Bhosale
Date: 2019.09.16 19:34:57 +05'30'

(स.ह.भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा व कु.क.तथा संचालक, रा.आ.अ, आरोग्य भवन,मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य भवन, मुंबई.
३. सहसंचालक (प्रशासन व अर्थसंकल्प) आरोग्य सेवा, मुंबई
४. सर्व उपसंचालक आरोग्य सेवा मंडळे.

५. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक.
६. सर्व जिल्हा अरोग्य अधिकारी.
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)- १ व २, महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
९. निवडनस्ती (सेवा-३)